## पोलीस अधिक्षक औरंगाबाद ग्रामीण

| | | |
|---|---|---|
| पोलीस अधिक्षक,कार्यालय | **प्रेस नोट** | दिनांक २७.०३.२०१७<br>०१.३० |

**प्रति,**

**मा.संपादक**

**दैनिक ..........**

**विषय :–औरंगाबाद ग्रामीण जिल्हयात दाखल /उघडकीस गुन्हयांबाबत.**

यावद्वारे आपणास सुचित करण्यात येते की, औरंगाबाद ग्रामीण जिल्हयात दिनांक २६.०३.२०१७ रोजी खालील प्रमाणे गुन्हे दाखल /उघडकीस आले आहेत.

**०१) पोस्टे बिडकीन:–** गुरन I १०६/१७ कलम २७९ ३०४(अ) ३३७ ३३८ ४२७ भादवि नमुद गुन्हयाचे फिर्यादी नामे संतोष अशोक खनाळे वय २९ वर्ष व्यवसाय मेडीकल दुकान रा. रामनगर पैठण यांनीफिर्याद दिली की दिनांक २४.०३.२०१७ रोजी ००.१५वा. दरम्यान यातील मयत:– सचिन पांडुरंग काटकर वय ३६ वर्ष रा. कावसान पैठण ता.पैठण याने त्याचे ताब्यातील स्कॉर्पीओ गाडी क्र. एमएच २० ईई ३५९७ हि हयगयी व निष्काळजीपणे चालवुन चालकाचा ताबा सुटल्याने यातील फिर्यादी व साक्षीदार यांना साधी व गंभीर दुखापत करून स्वत:चे मरणास कारणीभुत झाला व स्कॉर्पीओ गाडीचे नुकसानीस कारणीभुत झाला म्हणुन गुन्हा दाखल करण्यात आला असुनअधिक तपास पोह/१४४ पवार पोस्टे बिडकीन हे करीत आहे.

**०२) पोस्टे करमाड:–** गुरन I ११४/१७ कलम ३०७ ३२३ ५०४ भादवि यातील महिला फिर्यादी यांनी फिर्याद दिली की दिनांक २५.०३.२०१७ रोजी २२.३०वा. दरम्यान यातील फिर्यादी व आरोपी नामे राजु रघुनाथ दाभाडे रा. घाडेगाव ता.जि.औरंगाबाद हे नात्याने पती–पत्नी असुन फिर्यादी ही आरोपीस म्हणाली की तुम्ही दारू पिवुन का आलासअसे म्हणाल्याने आरोपीने फिर्यादीस शिविगाळ करून चापटबुक्याने मारहाण करून सदर गोष्टीचा राग मनात धरून आरोपीने फिर्यादीचे अंगावर कॅनमधिल रॉकेल अंगावर टाकुन तीला जिवे मारण्याच्या उद्देशाने काडीपेटीने

जाळले त्यात ती ८० टक्के जळाली म्हणुन गुन्हा दाखल करण्यात आला असुन अधिक तपास श्री. पवार पोउपनि पोस्टे करमाड हे करीत आहे.

**आकस्मात मृत्युः—**

**०१) पोस्टे वैजापुरः—** आ.मृ. नंबर २८/१७ कलम १७४ सिआरपीसी मधिल खबर देणार पोह/१०९९ आर. आर. गायके नेमणुक घाटी चौकी औरंगाबाद यांनी खबर दिली की यातील मयत नामे संगिता मच्छिंद्र थोरात वय ४२ वर्ष रा. जांबरगाव ता. वैजापुर हि राहते घरी जळाल्याने तीस उपचार कामी घाटी दवाखाना येथे दाखल केले होते औषधोपचार चालु असताना सदर बाई हि मयत झाली वगैरे खबरी वरून आ.मृ. दाखल करण्यात आला असुन अधिक तपास पोह/८७२ वेलगुडे पोस्टे वैजापुर हे करीत आहे.

**०२) पोस्टे फर्दापुरः—** आ.मृ. नंबर ०४/१७ कलम १७४ सिआरपीसी मधिल खबर देणार संदीप सिताराम जाधव वय ३२ वर्ष व्यवसाय हॉटेल चालक रा. फर्दापुर यांनी खबर दिली की यातील मयत अनोळखी पुरूष वय अंदाजे ५० वर्ष नाव गाव माहीत नाही याचे प्रेत फर्दापुर येथे गजानन टी स्टॉल येथे मिळुन आले वगैरे खबरी वरून आ.मृ. दाखल करण्यात आला असुन अधिक तपास सफौ धनवट पोस्टे फर्दापुर हे करीत आहे.

**मुंबई दारूबंदी कायदाः—**

औरंगाबाद ग्रामीण जिल्हयात पोस्टे कन्नडग्रामिण ला ०१ गुन्हा मुंबई दारूबंदी कायदया प्रमाणे ०१ ईसमा विरूध्द दाखल झाले असुन त्यांचे कडुन ६५०/—रू. किं १३ ली. गावठी हातभट्टी दारू असा एकुण माल जप्त करण्यात आला आहे.

**मुंबई जुगार कायदाः—**

औरंगाबाद ग्रामीण जिल्हयात पोस्टे खुलताबाद ला ०१ गुन्हा मुंबई जुगार कायदया प्रमाणे १० ईसमा विरूध्द दाखल झाले असुन त्यांचे कडुन ३४६०/—रू. नगदी व जुगाराचे साहीत्य असा एकुण माल जप्त करण्यात आला आहे.

स्वाक्षरीत
पोलीस अधिक्षक
औरंगाबाद ग्रामीण करीता

श्री सफौ पुरी नियंत्रण कक्ष अधिकारी औरंगाबाद ग्रामीण